शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर!! विश्वासाची परंपरा!!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी. रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड.
संपर्क : ०२३०३७७, मो. ८४३२७७१७७७
शाखा : माळीवेस, बीड
संपर्क : ०२२०३७७, मो. ९४०५०७२७७७

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
बीड । परभणी । छत्रपती संभाजीनगर । जालना । लातूर । धाराशिव । हिंगोली । नांदेड । नगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

बीड(महाराष्ट्र) • वर्ष ४ थे • अंक १५४ • गुरूवार, दि. १२ सप्टेंबर २०२४ • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रूपये

बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

॥ श्री गंधभारती कृपा ॥
आपल्या आवडीचा बेड आपल्या बजेटमध्ये
7038389999
ऑफर 10000 खरेदीवर १५% डिस्काऊंट
आदित्य फर्निचर मॉल
आजच बुक करा... आपल्या स्वप्नातील बेड...
सोमेश्वर मंदिरासमोर, वाशी रोड, बीड

# धनंजय मुंडेंचे वागणे शोभते का ? सांस्कृतिक कार्यक्रम अन् अतिवृष्टीवरुन संभाजीराजेंचा सवाल

**बीड । प्रतिनिधी**

मराठवाड्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या वेदना ऐकून दुःख होत आहे. पण कृषिमंत्री धनंजय मुंडे पीक नुकसानीची पाहणी करण्याऐवजी सांस्कृतिक कार्यक्रमात मग्न आहेत. हे म हाराष्ट्राला शोभते का, असा प्रश्न स्वराज्य पक्षाचे अध्यक्ष संभाजीराजे छत्रपती यांनी उपस्थित केला.

तालुक्यातील उंचडा, मार्लेगाव आणि धानोरा या गावांना भेट देऊन पीक नुकसानीची पाहणी केली. ते म्हणाले, शेतकऱ्यांचे संभाजीराजे यांनी आज हदगाव नुकसान पाहून अत्यंत दुःखी झालो आहे. एवढे नुकसान झाले आहे, तरीही आम दार, खासदार तर सोडाच कृषिमंत्रीही पाहणीला आले नाहीत. सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये ते व्यस्त आहेत.

### जीवन संपण्याचा विचार करू नका

'मदत न मिळाल्यास जीवन संपवण्याशिवाय मला पर्याय नाही' असे चव्हाण नावाच्या एका शेतकऱ्याने संभाजीराजे छत्रपती यांना सांगितले. त्यावर, 'स्वराज्य पक्ष शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे. शासनाची मदत मिळेपर्यंत वाट पाहणार नाही. दहा दिवसांत पक्षाकडून मदत देणार, जीवन संपवण्याचा विचार मनात आणू नका' असे आश्वासन संभाजीराजे यांनी दिले.

# खा. हेमामालिनींकडून धनंजय मुंडे यांच्या सामाजिक व विकासात्मक कार्याचे कौतुक

## हेमामालिनी यांच्या प्रमुख भूमिकेतील राधा रासबिहारी या संगीत नाट्याने परळीकरांना घातली भुरळ

**परळी वै. । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी नाथ प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून सामाजिक व सांस्कृतिक चळवळ जोपासली आहे. त्यांच्या म ाध्यमातून परळीकरांना एकापेक्षा एक सरस सांस्कृतिक कार्यक्रम पाहायला मिळतात, तसेच नाथ प्रतिष्ठान इथल्या जनतेच्या सुखदुःखात देखील बरोबरीने साथ देते. धनंजय मुंडे हे इथले आमदार व मंत्री म्हणून देखील कायम जनतेच्या सेवेत व विकासाच्या कार्यात मग्न असतात असे म्हणत ड्रीम गर्ल म्हणून अख्ख्या देशात प्रसिद्ध असलेल्या ज्येष्ठ सिने अभिनेत्री खा.हेमामालिनी यांनी धनंजय मुंडे यांचे परळी येथील

वैद्यनाथ गणेश महोत्सवात भरभरून कौतुक केले आहे.

परळी येथे ना धनंजय मुंडे यांच्या संकल्पनेतून व ज्येष्ठ नेते वाल्मीक अण्णा कराड यांच्या मार्गदर्शनाखाली सध्या सुरू असलेल्या श्री वैद्यनाथ गणेश महोत्सवात हेमा मालिनी यांच्या प्रमुख भूमिकेतील 'राधा रासबिहारी' या संगीत नाट्याचे आयोजन करण्यात आले होते.

या नाटिकेमध्ये वयाची ७५ वर्षे पूर्ण केलेल्या हेमामालिनी यांनी साकारलेल्या राधेने आणि सोबतच श्रीकृष्ण व गोपिकांची रासलीला तसेच सुदामापासून कंसापर्यंतच्या विविध साकारलेल्या भूमिका आदींनी परळीकरांना अक्षरशः भुरळ घातली.

विविध वेशभूषा साकारलेल्या सुमारे ५० कलाकारांचे दिग्दर्शन व निर्मिती स्वतः हेमा मालिनी यांनी केले (उर्वरित पान २ वर)

*ना.धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठान द्वारे आयोजित श्री वैद्यनाथ गणेश महोत्सव अंतर्गत आज आयोजित प्रसिद्ध अभिनेत्री तथा लोकसभा खासदार हेमामालिनी यांच्या प्रमुख भूमिकेतील संगीत नाट्य 'राधा रासबिहारी' मधील क्षणचित्रे.*

## त्रिमूर्ती सरकारने तात्काळ पिक विमा कंपन्या काळया यादीत टाकण्यासाठी मंत्रिमंडळाची बैठक घेऊन केंद्र सरकारकडे मंजुरीसाठी प्रस्ताव पाठवावा: वसंत मुंडे

**मुंबई । प्रतिनिधी**

खरीप आणि रब्बी पिक विमा वाटप संदर्भात महाराष्ट्र शासनाकडून पी एम एफ बी वाय २०२२/सी आर ६२/११ए ,दि.१३/०७/२०२२ ला केंद्र सरकारकडे आज तागायत कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या प्रधानमंत्री पिक विमा योजनेसाठी ४ वेळा पत्र व्यवहार करूनही विमा कंपन्या शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे वर्ग करण्यास तयार नाहीत कारण शासनाचे विमा कंपन्यावर नियंत्रण नाही आरोप ओबीसी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला. महाराष्ट्रात सन २०१६ पासून खरीप रब्बी हंगामासाठी जिल्हा निहाय खाजगी पिक विमा कंपन्यांच्या नेमणुका करण्यात आल्या आहेत प्रत्येक वर्षी जिल्हे बदलण्याची प्रक्रिया टेंडर द्वारे कंपनीची चालू असते परंतु प्रधानमंत्री पिक विमा योजना साठी वेगवेगळे निकष केंद्र व राज्य सरकारची नियमावली व पिक पेरणी पासून काढणे पर्यंत

च्या कालावधीमध्ये अतिवृष्टी, वीजं कोसळणे ,नैसर्गिक आग, गारपीट, वादळ ,चक्रीवादळ, पूर ,दुष्काळ, पावसातील खंड वेगवेगळे रोग पडल्यामुळे शेतकऱ्याचे उत्पन्नात घट झाली तर शेतकरी नियमानुसार पीकम्यास पात्र असतात असे पिकाची वर्ग वारी करून खरीप व रब्बी हंगामात शेतकऱ्यांना विमा संरक्षण देणे कायद्यानुसार बंधनकारक आहे. देशातील राजकीय नेत्यांच्या व अधिकाऱ्यांच्या सहकार्य घेऊन सर्वच खाजगी पिक विमा कंपन्या शेतकऱ्यांची आर्थिक लुट करीत आहेत . अनेक प्रकरणे तालुका न्यायालय जिल्हा न्यायालय उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयात चालू (उर्वरित पान २ वर)

## बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्यावतीने १४ वर्षांखालील खेळाडूंची निवड चाचणी

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या राज्यस्तरीय निमंत्रितांच्या स्पर्धा होणार असून त्यासाठी बीड जिल्हा क्रिकेट असोसएशनतर्फे वर्षांखालील खेळाडूंसाठी जिल्हा संघ निवड चाचणी शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे बुधवारी (दि.११) घेण्यात आली. यावेळी शेकडो खेळाडूंनी सहभाग नोंदविला. (उर्वरित पान २ वर)

## २९ सप्टेंबर रोजी बीडमध्ये मराठवाडा केसरी भव्य बैलगाडा शर्यतीचे आयोजन : राजेंद्र मस्के

**बीड । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के मित्र मंडळाच्या वतीने दिनांक २९ सप्टेंबर रविवार रोजी बीडमध्ये मराठवाडा केसरी भव्य बैलगाडा शर्यतीचे आयोजन केले आहे. मागील शर्यती दरम्यान घोषणा केल्या प्रमाणे सोनालीका ट्रॅक्टर पहिले बक्षीस ठेवण्यात आले आहे. बैलगाडा शर्यत शौकीन शेतकरी बांधवांनी रीतसर नाव नोंदणी करून, या शर्यतीत

बहुसंखेने सहभाग घ्यावा. असे आवाहन शेतकरी मित्र राजेंद्र मस्के यांनी केले आहे.

बैलगाडा शर्यत महाराष्ट्रातील पारंपारिक हौसी खेळ आहे. गावोगावी सन उत्सव किंवा विशेष कार्यक्रमाच्या निमित्ताने शेतकरी बांधवाना प्रोत्साहित करण्यासाठी बैलगाडा शर्यतीचे अनेक गावात नियोजन केले जाते. बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रातील खेडोपाडी बैलगाडी शर्यत लोकप्रिय झाली. हौसी शेतकऱ्यांसाठी यापूर्वी दोन वेळा राजेंद्र मस्के मित्र मंडळाच्या वतीने स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. (उर्वरित पान २ वर)

*दैनिक मराठवाडा पत्र च्या कार्यालयामध्ये श्रींची आरती करताना ॲड. अजित देशमुख , गणेश खजानदार, श्री.कदम, दैनिक मराठवाडा पत्र चे संपादक दत्तात्रय नरनाळे, तनश्री नरनाळे, (छायाचित्र: आराध्या नरनाळे .)*

# बंगल्यात घरघर...

## क्षिर झालेल्या सागरात भयाचे उधाण आपले मिटवा नाव टिकवा ?

काकुंच घर फुटल असे कुनी म्हंटले असते तर दिवसा पिला का असेच म्हटले गेले असते मात्र फुटले. राजकारणात सख्य नसते तर सोय असते, क्षिरसागर बंधू या हेडिंग मधील एक बंधू बीड मधून मुंबईला जायला उतावीळ होते शहरी भाषेत उत्सुक, यातून त्यांची घाई हातघाई ठरली आणि बंगल्याची एक भिंत कोसळली संदीप क्षिरसागर यांनी आपले गोपाळ निवडले कुणाच्या लक्षात येऊ न देता बंडाचे खल व मशागत केली. नगर परिषदेच्या निमित्ताने बी फॉर्म देई पर्यंत सोबत असलेले एक मुस्लिम नेतृत्व थोरल्या बंधुंना गाफील ठेवण्यात यशस्वी झाले आणि आघाडी उघडली आणि क्षीरसागराची घडी बिघडली . टेंभा लक्षांत येईपर्यंत गंज ढना ढना पेटली. अनेकांना

### क्रॉसलाईन

फोडणारा बंगला फुटला थेट थोरल्या हातांना जेर आणि बंद करत धाकल्या क्षीरसागर यांनी धाकली सदर उभी केली आसामी थेट आमदार झाली जयदत्त अण्णा यांनी अपरिहार्यपणे परळी सोबत लाऊन घेतले आणि सेनेत प्रवेश केला . सेना त्यांच्या नैसर्गिक स्वभावात बसत नसताना त्यांनी मातोश्री चे बंधनात ते अडकले.

यात मूळ बंड बाजूला राहिले जे नैसर्गिक प्रसूती नजिक होते ते म्हणजे भारत भूषण क्षीरसागर ,कारण कुठवर नाल्या काढू हा त्यांचा मनस्ताप आणि संताप बाहेर आलाच नव्हता दरम्यान योगेश क्षीरसागर यांना देखील मनस्तापाचा वारसा चालवावा लागला आणि शेवटी त्यांनी अनेपेक्षित उडी मारली मुदतपूर्व प्रसुतीने योगेश क्षिरसागर यांचे राजकीय बाळसे झाले अन् सूरवात अशक्त झाली यातून बंगला तीन जागेवर गेल्याने अवसानात आला मग गाववाले शहर जिंकण्यासाठी सरसावले यातून फुटलेले क्षीरसागर राजकीय पातळीवर कुपाटीवर जाऊन बसले आहेत अश्या वेळी आपले मिटवा आणि नाव टिकवा या भयाने एकमेकांचे आकुंचन होताना दिसते आहे राजकीय सोय म्हणून विभागणी आणि राजकीय भयाने आता पुन्हा एकत्रीकरण अपरिहार्य पणे प्रस्तावित आहे.

## जाहीर प्रगटन

बीड जिल्हयातील सर्व जनतेस सूचित करण्यात येते की, मौजे रत्नागिरी ता. जि. बीड येथील शेत जमीन गट क्र. / सर्व्हे नं. ८७/४ व घर मिळकत क्र. ७८ तसेच मौजे नेकनूर ता.जि.बीड येथील घर मिळकत क्र.२८१४ ही सदरील जमीनीचे मुळ मालक केशव राणुजी (राणू शिंदे) असून ते मयत आहेत. मात्र त्यांचा मुलगा श्रीपती केशव शिंदे वारस आहे. पण हा पूर्णपणे दारुच्या व्यसनापाई सदरील मिळकत विक्री करण्याच्या प्रयत्नात असून त्यामुळे त्याचे मुले नामे वैभव श्रीपती शिंदे व पत्नी दिपमाला श्रीपती शिंदे यांचे न भरुन येणारे नुकसान होईल. तसेच सदरील मिळकती बाबत बीड येथील न्यायालयात मनाई हुकमाचा दावा प्रलंबित असून देखील सदरील व्यक्ती वरील जमीन व घर मिळकत विक्री करण्याच्या प्रयत्नात आहे. तरी आमच्या पक्षकाराच्या परस्पर सदरील मिळकत कुणीही खरेदी-विक्रीचा व्यवहार करु नये. सदरील व्यवहार आमच्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही. तसे झाल्यास आमचे पक्षकार संबंधिताविरुध्द योग्य ती कडक कार्यवाही करतील. तसेच सदरील बेकायदेशिर खरेदी खत मा. न्यायालयात रद्द करतील. ज्याच्या खर्चास व परिणामास सदरील मिळकतीचे खरेदीदार यांना समोरे जावे लागेल.

करीता हे जाहीर प्रगटन ...

**जाहीर प्रगटन देणार -**
**१) दिपमाला भ्र. श्रीपती शिंदे**
**२) वैभव श्रीपती शिंदे**

**मार्फत : ॲड एल.आर.गंगावणे, जिल्हा व सत्र न्यायालय, बीड.**

## संपादकीय

# घटना घडल्यानंतर नियम करता, सध्या घडणाऱ्या गुन्ह्यांचं काय?

## राज्य सरकार महिला अत्याचाराबाबत गंभीर नाही; हायकोर्टाचे निरीक्षण

राज्य सरकार महिला अत्याचारांबाबत अजिबात गंभीर नाही. सध्या काय सुरू आहे राज्यात?, पोलीस जर घटनेचा तपासच नीट करत नसतील तर गरीब व आधारहिन महिलांनी कोणाकडे दाद मागायची?, असे सवाल उपस्थित करत हायकोर्टानं राज्य सरकारवर तीव्र ताशेरे आढले आहेत.

संपूर्ण व्यवस्था कोलमडत चाललेली असताना या सर्वांना वठणीवर आणण्यासाठी एक दणकाच द्यायलाच हवा, असा गर्भित इशाराही हायकोर्टानं दिला आहे. महिला अत्याचारासंबंधित विविध याचिकांवर सुनावणी करताना न्यायमूर्ती अजय गडकरी व न्यायमूर्ती डॉ. नीला गोखले यांच्या खंडपीठानं बुधवारी राज्य सरकारला चांगलंच धारेवर धरलं.

बलात्कार पीडितेचे कपडे जप्त न करणाऱ्या पोलीस अधिका-याला शौर्य पुरस्कार द्या, नाहीतर निलंबित करा. त्याच्याशी आमचं काही देणं घेणं नाही. पण कोर्टानं फटकारल्यानंतरच तुम्हाला कारवाईची उपरती कशी होते? गुन्हा नोंदवल्यानंतर किमान त्यासंदर्भातले पुरावे तरी गंभीरतेनं गोळा करायला हवेत. मुळात सरकारच महिला अत्याचाराबाबत गंभीर नाही. यंत्रणेतील ज्येष्ठांपासून कनिष्ठांपर्यंत कोणालाच संवेदना राहिलेल्या नाहीत. राज्य शासनाला कसलंच गांभीर्य उरलेलं नाही, असं आम्ही समजावे का?, या शब्दांत हायकोर्टानं राज्य सरकारचे कान उपटलेत.

पीडितेचे कपडे कसे जप्त करावेत?, याची नियमावली लवकरच तयार केली जाणार असल्याचं प्रतिज्ञापत्र राज्याच्या गृह विभागानं हायकोर्टात सादर केलं. मात्र आम्ही महिला अत्याचारासंदर्भातील अनेक मुद्दयांवर खुलासा मागितला होता. या प्रतिज्ञापत्रात त्याबाबत काहीच भाष्य केलेलं नाही. मुळात नियमावली हा तोडगाच असू शकत नाही. भविष्याची नियमावली तयार करण्याआधी वर्तमानातील गुन्हे आटोक्यात आणायला हवेत, असंही हायकोर्टानं यावेळी नमूद केलं.

एखाद्या प्रकरणात एक अधिकारी चुकला म्हणून संपूर्ण पोलीस दलावर ठपका ठेवता येणार नाही. प्रत्येक तपास हा गांभीर्यानंच केला जातो, असं प्रतिज्ञापत्र मुंबई पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर यांनी काही दिवसांपूर्वी हायकोर्टात सादर केलं होत. त्यावर हायकोर्टानं तीव्र संताप व्यक्त केलाय. प्रत्येक तपास योग्य प्रकारे केला गेला असता तर १०० पैकी ८० प्रकरणे योग्य तपासणीचे आदेश देण्याची मागणी करत कोर्टात आली नसती, असं हायकोर्टानं मुंबई पोलीस आयुक्तांना सुनावलंय. आमच्यासमोर सुनावणीसाठी दररोज अनेक प्रकरणं येतात ज्यामध्ये हल्ली आरोपीचं हित जपणारा तपास पोलीस करतायत हेच दिसून येतंय. पीडितेला न्याय देणारा तपास करण्यात कोणालाच स्वारस्य नसल्याचं चित्र सध्यातरी अनेक ठिकाणी दिसत आहे. त्यामुळे भविष्यात तुम्ही काय कराल, देव जाणे. हे संपूर्ण चित्र बदलण्यासाठी आता योग्य ते आदेश द्यावेच लागतील, असंही यावेळी हायकोर्टानं नमूद केलं.

# परळी औष्णिक विद्युत केंद्रात नवीन संच क्रमांक ९ ची उभारणी होणारच; त्यासाठी शर्तीचे प्रयत्न सुरू : धनंजय मुंडे

▸ उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची यासंदर्भात घेणार भेट

मुंबई । प्रतिनिधी

मराठवाड्याचे भूषण व परळीची अर्थवाहिनी असलेल्या परळी तालुक्यातील नवीन औष्णिक विद्युत केंद्रात नविन संच क्रमांक ९ हा यापूर्वीच मंजूर झालेला आहे . या संचाची उभारणी रद्द होणार नाही ,हा संच उभारावा यासाठी आपण शर्तीचे प्रयत्न करणार आहोत. असे राज्याचे कृषीमंत्री मंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे. ते पुढे म्हणाले की, संच क्रमांक नऊ उभारण्यासाठी सर्व सुविधा उपलब्ध असून हा संच उभारणीस मान्यता देण्यात यावी, अशी मागणी आपण उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली असून यासंदर्भात लवकरच श्री फडणवीस यांची भेट घेणार आहेत.

मागील छत्रपती संभाजी नगर येथे संपन्न झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत याबाबत मुख्यमंत्री महोदयांनी घोषणा केली होती. याबाबत महानिर्मितीने केलेल्या सर्वेक्षणानंतर पाणी, कोळसा इत्यादी गोष्टींची उपलब्धता नाही असा अभिप्राय महानिर्मितीच्या स्थानिक प्रशासनाने राज्य शासनास सादर केल्यामुळे नव्या संचाच्या उभारणीस अडचणी निर्माण होतील अशी शंका निर्माण झाली आहे.

मात्र परळी येथील औष्णिक विद्युत केंद्रात पासून जवळ असलेल्या खडका बंधाऱ्यांमध्ये माजलगाव धरण व जायकवाडी धरण येथून पाण्याची कमतरता भासल्यास पाण्याचे आवर्तन घेता येते आणि असा प्रसंग पाच ते सहा वर्षात कधीतरी एखाद्यावेळी येतो मात्र पाण्याची कमी भासत नाही.

त्याचबरोबर नाशिक, भुसावळ, पारस ही औष्णिक केंद्र देखील कोळसा खानीपासून दूरच आहेत, मात्र इलेक्ट्रिक रेल्वेमुळे तिथे कोळसा लवकर पोहोचतो त्याच पद्धतीने परळीत देखील डबल ट्रॅक चे काम सुरू असून परळीत देखील रेल्वेने कोळसा पोहोचण्यास कोणतीही अडचण नाही. त्याचबरोबर परळी येथे औष्णिक विद्युत केंद्रात नवीन प्रकल्प उभारण्यासाठी वेगळी जागा विकत घेण्याची गरज नाही तसेच मनुष्यबळ उपलब्धी व कर्मचाऱ्यांच्या वसाहती हे देखील औष्णिक विद्युत केंद्र परिसरातच असल्याने त्या देखील जमेच्या बाजू असल्याचे धनंजय मुंडे यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे.

दोनच दिवसांपूर्वी प्रकल्पग्रस्तांच्या विविध मागण्यांच्या संदर्भात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत झालेल्या बैठकीत देखील धनंजय मुंडे यांनी परळी औष्णिक विद्युत केंद्रात नवव्या संचाच्या उभारणीचा मुद्दा उपस्थित केला होता तेव्हा देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत लवकर सकारात्मक निर्माण घेऊ असाही शब्द दिला होता. त्यालाच अनुसरून धनंजय मुंडे यांनी पत्राद्वारे ही मागणी केली आहे.

दरम्यान परळीतील जुन्या औष्णिक विद्युत केंद्रातील संच क्र. १ ते ५ यांचे आयुर्मान संपल्याने ते स्क्रॅप केले असून त्याजागी सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याबाबतही शासन सकारात्मक आहे. नव्याने संच उभारणीसाठी स्थानिक प्रशासनाने काहीही अभिप्राय दिलेला असला तरीही आपण राज्य शासन स्तरावर ९वा संच उभारन्यास मंजुरी मिळवणार आहोत, त्यामुळे गैरसमज करून घेऊ नये, असे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.

*दैनिक मराठवाडा पत्र चे अवलोकन करतांना ॲड. अजित देशमुख*

# देवडी येथे काळविटाचा बिबट्याने पाडला फाडशा

▸ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील देवडी येथे एका शेतकऱ्याच्या उसाच्या शेतामध्ये बिबट्याने काळवीटाची शिकार करुन अर्धवट खाल्लेले काळवीटाचे शरीर दिसून आल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून वनविभागाने तात्काळ पिंजरा बसवण्याची मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

सविस्तर वृत्त असे की तालुक्यातील देवडी येथील शेतकरी रामप्रसाद बाबुराव आगे यांच्या शेतातील गट नंबर ७७ मध्ये उसाच्या शेतात अर्धवट खाल्लेले काळवीटाचे शरीर शेतकऱ्याला दिसून आले. काळवीटाच्या अवतीभवती बिबट्या सदृश्य ठसे दिसून आले.याची कल्पना धारूर वन विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आली.वन विभागाचे अधिकारी दुर्घटनाग्रस्त शेतात गेले असता. त्या ठशांची पाहणी केली.अर्धवट खाल्लेल्या काळवीटाची पाहणी केली असता.या काळवीटाची शिकार बिबट्याने केली असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.त्यामुळे नागरिकांमध्ये व शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.वन विभागाने तात्काळ पिंजरा आणून बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी शेतकऱ्यांमधून केली जात आहे.तर

या वेळी वन विभागाचे अधिकारी संभाजी पारवे ,एस आर मात्रे, एल ए गंगावने,यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.देवडी व पंचक्रोशीतील शेतकऱ्यांनी आपली जनावरे उघड्यावर बांधू नये,शेतात आखाड्यावर उजेड करावा,टेप मोबाईलची गाणी लावावी,शेतात रात्री अपरात्री जाणे टाळावे,अधिसूचना वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना व नागरिकांना सूचना देण्यात आल्या आहेत.

पान १ वरून पुढे...

## खा. हेमामालिनींकडून धनंजय...

होते त्याचबरोबर प्रत्येक कलाकाराच्या मेकअप पासून ते वेशभूषेपर्यंत सर्वांची तपासणी सुद्धा त्या स्वतः करत होत्या. या वयात कलेप्रती त्यांचा उत्साह पाहून नवोदित कलाकारांना नक्कीच प्रेरणा मिळेल. अभिनेत्री तथा खासदार हेमामालिनी यांचे नाथ प्रतिष्ठानच्या वतीने सौ राजश्रीताई धनंजय मुंडे यांनी स्वागत केले त्याचबरोबर नात प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांच्या मार्फत आलेल्या सर्व कलाकारांचे यथोचित स्वागत यावेळी करण्यात आले.

## त्रिमूर्ती सरकारने तात्काळ पिक ...

असून शासनाकडे शेतकऱ्यांच्या तक्रारी पिक विमा संदर्भात आहेत परंतु कारवाई नियमानुसार केली जात नाही. केंद्र व राज्य सरकारचे कृषी पीक विमा कंपन्या संदर्भातले खाजगी धोरण जबाबदार आहे, कारण पिक विमा कंपन्यांना २० ते ३५ टक्के कमिशन मिळते . पिक विमा कंपन्यावर राज्य व केंद्र सरकार कठोर भूमिका घेत नसल्यामुळे सर्व बाजूने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडलेला आहे.वेगवेगळे नियम दाखवून पिक विमा कंपन्या स्वतःचा स्वार्थ साधित असून त्यामध्ये अधिकारी व लोकप्रतिनिधी मंत्री यांचा हात असल्याचा आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केला. केंद्र सरकारचा अर्धा हिस्सा व राज्य सरकारचा अर्धा हिसा एकत्र करून नियमानुसार पीक विमा संदर्भात निकष आहेत, त्यामध्ये विमा शेतकऱ्यांना पिकाच्या टक्केवारी नुकसान भरपाई देण्यात येते. याच गोष्टीचा गैरफायदा पिक विमा कंपनीने घेऊन करोडो रुपये शेतकऱ्याच्या शासनाच्या पिक विमा योजनेमध्ये कमावले आहेत. महाराष्ट्र च्या त्रिमूर्ती सरकारने एक रुपयाचा पिक विमा उतरण्यासंदर्भात शेतकऱ्यांना गाजर दाखवलेले आहे, परंतु आज तागायत शेतकऱ्यांनी अनेक प्रकरणे पिक विमा संदर्भात माननीय उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाचे पिक विमा शेतकऱ्यांना वाटप करण्याच्या आदेशा राज्य सरकारकडे देऊन ही पिक विमा कंपन्या न्यायालयाच्या आदेशाचे पालन करीत नाहीत. तसेच केंद्र व राज्य सरकारचे सर्वच बाजूंनी शेतकऱ्यासंदर्भात शेतीमालाचे आयात निर्यात धोरण चुकीचे आहे , शेतकऱ्याचा माल तयार झाला की आयात माल परदेशातून करून देशातील शेतकऱ्यावर अन्याय केला जातो व शेतीमालाचे भाव पाडले जातात परदेशातील व्यापाऱ्याकडून टक्केवारी मिळाली जाते हे खरे कारण आहे व देशातील व्यापाऱ्यांना शेतीमाल भाव पाडून खुश करणे व शेतकऱ्यावर अन्याय करणे हे खरे धोरण केंद्र व राज्य सरकारच्या भाजपच्या सरकारचे असल्याचा गंभीर आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केला. बोगस खते बी बियाणे कीटकनाशके संदर्भात शेतकऱ्याला नुकसान भरपाई देण्याचे कायद्यात तरतूद नाही तरीही केंद्र व राज्य सरकार कायदा करण्यास अकार्यक्षम आहे. १८% शेती अवजारे खते बि बियाने कीटकनाशके औषधी व इतर साहित्य यावर जीएसटी कर लावल्यामुळे शेतकरी सर्व बाजूने आर्थिक संकटात सापडलेला आहे. महाराष्ट्रातील पिक विमा कंपन्यानी पिकाचे नुकसान झाल्यास ई पिक पाहणी पंचनामे नोंदणी शक्तीची केली, ७२ तासाच्या ऑनलाइन तक्रार पिक विमा कंपनीकडे करण्यासंदर्भात अट टाकली तसेच महाराष्ट्रातील सर्व शेतकरी सुशिक्षित नाहीत व मोबाईलचे वापरण्यासंदर्भात कमी ज्ञान आहे तरी शासन कोणतीही दखल शेतकऱ्यासंदर्भात घेत नाही उलट कंपनीची बाजू सरकार घेते. शेतकऱ्याला अँड्रॉईड मोबाईल द्वारे नोंद कशी करावी पकसे चालू करावे याचे ज्ञान नाही. पिक विमा कंपन्यांचे व कृषी खात्याचे कर्मचाऱ्यांचे शेतकऱ्यांना या संदर्भात सहकार्याची भूमिका नाही , ई सेवा केंद्रावर शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा गैरफायदा घेऊन आर्थिक लूट केली जात आहे तरीही शासन स्तरावर कारवाई ई सेवा केंद्रावर व पिक विमा कंपन्या शेतकऱ्याचा पैसा वापरीत आहेत तरीपण केंद्र व राज्य सरकार कडून पिक विमा कंपनीवर कडक कायदेशीर कारवाई केली जात नाही. कोरोना काळातील व आजतागायत केंद्र व राज्य सरकारच्या एनडीआरएफ व एसडीआरएफ निकषाचे पालन पिक विमा कंपन्या करीत नाहीत . करिता महाराष्ट्र शासनाने तात्काळ की पिक विमा कंपन्या काळा यादी टाकून मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये ठराव घेऊन केंद्र सरकारकडे मंजुरीसाठी पाठवा शासकीय कंपन्याला पिक विमा कंपन्याचे कामे देण्यात यावी अशी मागणी ओबीसी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी शासनाकडे केली आहे.

## बीड जिल्हा क्रिकेट ...

प्रमुख अतिथी असलेले बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे कार्याध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले की, बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या खेळाडूंनी राज्य, देश पातळीवर खेळून बीड जिल्ह्याचा नावलौकीक केलेला आहे. बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्यावतीने खेळाडूंची निवड ही केवळ त्यांचा खेळ पाहूनच केली जाते. असोसिएशनचा कारभार हा अत्यंत पारदर्शक आहे. बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे नाव महाराष्ट्रातील अग्रस्थानी असलेल्या असोसिएशनच्या यादीत घेतले जाते. यावेळी त्यांनी खेळाडूंना उत्कृष्ट कामगिरी करून संघात स्थान मिळावे अशा शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी माजी नगरसेवक जैतुला खान, शुभम धूत, बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सचिव आमेर सलीम, सदस्य महेश वाघमारे, राजन साळवी, इरफान कुरेशी, जावेद पाशा, मनोज जोगदंड, सरफराज मोमीन, शेख आरेफ, अतिक कुरेशी, अक्षय नरवडे, शाहरुख पठाण यांच्यासह पदाधिकारी, सदस्य, खेळाडू उपस्थित होते.

## २९ सप्टेंबर रोजी बीडमध्ये...

उदंड प्रतिसाद लक्षात घेऊन याही वर्षी भव्य बैलगाडा शर्यतीचे भव्य बक्षीसासह आयोजन केले आहे. बीड शहरालगत बीड - अहमदनगर हायवे, तळेगाव शिवारात या स्पर्धा संपन्न होतील. प्रथम बक्षीस सोनालिका ट्रॅक्टरसह अन्य रोख बक्षिसे देण्यात येतील. नोंदणीकृत स्पर्धकांनाच शर्यतीत सहभाग घेता येईल. संघर्षयोद्धा भाजपा जनसंपर्क कार्यालय, बीड येथे नाव नोंदणी सुरु आहे. अशी माहिती राजेंद्र मस्के मित्र मंडळाने कळवली आहे. संपर्क - ९९२१११४९५४, ९१३०८८७८८८, ९३५९००५८७९, ९८६०९११०९९

पान ४ वरून पुढे...

## बोंबला.. माजलगाव...

तहसीलदार माजलगाव यांना निवेदन दिले यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ड नारायण गोले पाटील यांनी तहसीलदार यांनी वृद्ध अपंग व गर्भवती महिला यांच्यासह नागरिकांची हेळसांड थांबवावी अन्यथा १७ सप्टेंबर पासून तहसील कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला असून या निवेदनावर शेतकरी कामगार पक्षाचे मध्यवर्ती समिती सदस्य भाई ड नारायण गोले पाटील,तालुका चिटणीस भाई मुंजा पांचाळ तालुका सह चिटणीस भाई राहुल सोळंके, भाई सतीश शेजुळ पुरोगामी युवक संघटनेचे तालुका अध्यक्ष भाई अशोक कुलकर्णी भाई चांगदेव शेजुळ भाई आनंत चव्हाण, भाई विष्णू शेळके भाई सुदाम चव्हाण भाई गोविंद घाटूळ भाई माऊली चंदनशिव आदींच्या स्वाक्षरी आहेत.

## केज विधानसभेसाठी...

आंदोलनाचा प्रश्न तेवत ठेवला असून पूर्ण महाराष्ट्रभर दौरे करत आहेत. त्याचबरोबर सरकारने येणाऱ्या काही दिवसात जर मराठ्यांना आरक्षण दिले नाही तर पूर्ण महाराष्ट्र मधून विधानसभेसाठी उमेदवार उभे करणार असल्याची जाहीर केल्यानंतर महाराष्ट्रातील अनेक इच्छुक उमेदवारांनी जरांगे पाटलांच्या भेटी घेत उमेदवारीची मागणी केली याच अनुषंगाने केज विधानसभा मतदारसंघ हा राखीव मतदार संघ असल्याने नेकनूर येथीलच विद्यमान सरपंच अनिता सुंदर लांडगे यांनी नेकनूर येथील ग्रामपंचायत सदस्यांसह शिष्टमंडळात सोबत जाऊन जरांगे पाटील यांची भेट घेऊन मी ही केज विधानसभा मतदारसंघातून उभा राहण्यासाठी इच्छुक आहे अशी मागणी केली यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी सर्वांना सोबत घेऊनच येणाऱ्या काळात निर्णय घेणार आहे जर असा निर्णय घेण्यात आला तर नक्कीच तुमचा विचार करू असेही त्यांनी यावेळी नेकनूरच्या शिष्टमंडळास बोलताना उत्तर दिले.

## जिल्हा वकील संघाला...

मंगळवारी (दि.१०) रोजी बीड जिल्हा न्यायालय परिसरात बीड जिल्हा वकील संघाच्या नवनिर्वाचित कमिटीची भेट घेऊन संवाद साधला. तसेच नवनिर्वाचित अध्यक्ष, सचिव यांच्यासह सर्व कमिटीला निवडीबद्दल शुभेच्छा दिल्या. यावेळी बीड जिल्हा वकील संघाचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अंबादास दादा दानवे...

शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा ताई अंधारे,शिवसेनेचे बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुरामाजी जाधव साहेब यांच्या आदेशाने ही बैठक पार पडणार आहे. या बैठकीसाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाराष्ट्र राज्याचे विरोधी पक्षनेते तथा शिवसेनेचे मराठवाडा संपर्क नेते अंबादास दादा दानवे साहेब हे मार्गदर्शन करणार आहेत त्यांच्यासोबत शिवसेनेचे सहसंपर्कप्रमुख तथा माजी मंत्री बदामरावजी आबा पंडित,शिवसेनेचे लोकसभा प्रमुख माजी आमदार सुनील धांडे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते,शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गणेश वरेकर,शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे या सर्वांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक होणार आहे..

तरी बीड जिल्ह्यातील शिवसेनेचे सर्व आजी-माजी पदाधिकारी अंगीकृत संघटनांचे पदाधिकारी,शिवसेना महिला आघाडी, युवासेना,शेतकरी सेना,शिक्षक सेना, अल्पसंख्यांक सेना या सर्वांचे प्रमुख पदाधिकारी उपजिल्हाप्रमुख,जिल्हा संघटक सर्व तालुकाप्रमुख, शहरप्रमुख, उपतालुकाप्रमुख शाखाप्रमुख,बूथ प्रमुख,गणप्रमुख त्याचप्रमाणे सर्व शिवसैनिक यांनी सकाळी ठीक दहा वाजता हॉटेल ग्रँण्ड यशोदा या ठिकाणी या महत्त्वाच्या बैठकीसाठी उपस्थित रहावे.

या बैठकीमध्ये पक्ष संघटना बांधणी व अन्य विषयांवर या बैठकीमध्ये सविस्तर चर्चा होणार आहे,तरी ही बैठक येणाऱ्या निवडणुकीच्या अनुषंगाने महत्त्वाची असून जिल्हाभरातील शिवसेनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी या बैठकीसाठी अगदी वेळेवर बैठक सुरू होणार असल्याने सकाळी ठीक दहा वाजता हॉटेल ग्रँण्ड यशोदा या ठिकाणी उपस्थित रहावे असे आव्हान शिवसेनेचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी केले आहे.

## आजी- माजी कुणीच नको...

मतदारसंघातील गावागावात भेटी देऊन सर्व सामान्य लोकांशी चर्चा केली. यावेळी जनतेतून त्यांना उस्फूर्त प्रतिसाद मिळत असून, मतदार संघातील प्रस्थापित नेत्याबद्दलचा रोष नागरिक बोलून दाखवित आहेत. केवळ पर्याय नसल्यानेच दगडापेक्षा वीट मऊ यामुळे कुणाला तरी मते द्यावी लागत असल्याच्या प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करीत असून ड. जाधव यांना निवडणूक लढविण्यासाठी तन मन धनाने आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू असा विश्वास नागरिक बोलून दाखवित आहेत.

ॲड. नरसिंह जाधव यांनी गेल्या वर्ष भरापासून मतदार संघात संपर्क ठेवून आहेत. तीन दिवसांत त्यांनी आष्टी तालुक्यातील आष्टी शहर, चिंचपूर, आष्टा, मैदान मातकुळी, मातावळी, भातोडी, खेडकर सांगवी, खडकत, टाकळसिंग व पाटोदा तालुक्यातील सुप्पा सावरगाव, वहाली, अंतापूर,मूगगांव, चिंचोली येथील जेष्ठ मंडळी, युवा सहकारी तसेच गावकऱ्यांची भेट घेतली, त्याप्रसंगी तालुक्यातील विविध सामाजिक राजकीय विषयांवर चर्चा करण्यात येऊन. सर्व सामान्यांच्या समस्या ऐकून घेऊन त्या सोडविण्यासाठी प्रशासकीय अधिकाऱ्यांशी चर्चा करून प्रश्न मार्गी लावले जात आहेत. काही प्रकरणात न्यायालयीन लढा लढण्यासाठी कायदेशीर मदतही लोकांना होत असल्याने जनतेतून त्यांना उस्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे.

## मतदारसंघातील भ्रष्टाचारी आणि दहशतीचे राजकारण संपण्यासाठी निवडणुकीच्या रिंगणात

**यावेळी लोकांशी चर्चा करताना ॲड. नरसिंह जाधव यांनी सांगितले की, आज आष्टी मतदार संघात आतापर्यंतच्या नेतृत्वाने केवळ आपले आणि आपल्या बगल बचच्याचे घरे भरुन सर्व सामान्य जनतेची पिळवणूक केली आहे. आज मतदार संघात भ्रष्टाचार आणि दहशतीचे वातावरण आहे. शासकीय योजना मंजूर करून आणायच्या आणि कागदोपत्री योजना राबवून शासकिय पैसा आपल्या खिशात घालायचं हेच धोरण राबविले जात आहे. या विरोधात कुणी आवाज उठविला तर त्याला दाबण्यसाठी जोर जबरदस्ती करून आवाज दाबला जातो. मात्र आपण या विरोधात आवाज उठविला. शासकीय योजनामधील भ्रष्टाचाराविरुद्ध जनहित याचिका दाखल करण्यात येऊन भ्रष्टाचार रोखण्यासाठी प्रयत्न केले असल्याचे सांगून ही भ्रष्ट, दहशत संपविण्यासाठी आपण निवडणूक लढवीत असल्याचे ॲड. जाधव यांनी सांगितले.**

## महामानव डॉ.आण्णाभाऊ साठे..

अण्णाभाऊ साठे यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात यावे. २) जगत विख्यात साहित्य सम्राट लोकशाहिर महामानव डॉ. अण्णाभाऊ साठे यांची जन्मभुमी व कार्यभुमी असणाऱ्या सांगली जिल्ह्याला डॉ. अण्णाभाऊ साठे नगर असे नाव देण्यात यावे. ३) जगत विख्यात साहित्य सम्राट लोकशाहिर महामानव डॉ. अण्णाभाऊ साठे यांची विकीपिडीया सत्य इतिहासावर आधारीत उच्च दर्जाची बणवण्यात यावी. ४) मुंबई येथील गोल्ड मोहर मिल ही जागा डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकासाठी देण्यात यावी. या मागण्यासाठी केलेल्या रास्तारोको आंदोलनामुळे दोन किलोमीटर अंतरावर राग लागली होती.

## भारतीय जवान किसान...

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष राजरत्न आंबेडकर,स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष खासदार राजू शेट्टी,भारतीय जवान किसान पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष माननीय नारायण अंकुशे यांनी दि.९ रोजी पाहणी करून शेतकऱ्यांना धीर देण्याचे काम केले आहे.

काढण्यास आलेली पिके पाण्यात सडून गेली तर अनेकांचा संसार रस्त्यावर आला.गाई, गुरे, शेळ्या यासह संसार उपयोगी वस्तू पाण्यात वाहून गेल्या आहेत.नैसर्गिक आपत्तीच्या वेळेस जी मदत सरकारकडून मिळायला हवी होती ती मिळालेली नाही परंतु यापुढे जर बाधित शेतकऱ्यांना सरसकट मदत मिळाली नाही तर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा भारतीय जवान किसान पार्टीचे महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष माजी सैनिक अंकुश खोटे यांनी माध्यमांशी बोलताना दिला.

# कोल्हापूर मध्ये अनुदानासाठी विनाअनुदानित शाळा कृती समितीचे गौरीपुजन सणाच्या दिवशीही आंदोलन सुरूच

## आज आंदोलनाचा ४२ वा दिवस; गडचिरोली, वर्धा नागपूर, पुणे बीड या ठिकाणाहून शिक्षक कोल्हापूर मध्ये दाखल

**कोल्हापूर । प्रतिनिधी**

तुच सुखकर्ता तुच दुः खहर्ता, अवघ्या दीनांच्या नाथा बाप्पा मोरया रे, बाप्पा मोरया रे, चरणी ठेवितो माथा पहा झाले पुरे ४२ दिवस आंदोलन, आता तुम्हीच हेरावे सरकारचे मन, शासनाचा होईना जीआरला स्पर्श, एकदाचा व्हावा आम्हाला अनुदानाचा हर्ष, घ्यावा जाणुनी हा परामर्श, पुऱ्या २४ वर्षाची २०० आंदोलनाची कशी गातो आम्ही गाथा, सरकारला दे सुबुद्धी आता... बाप्पा मोरया रे, बाप्पा मोरया रे, चरणी ठेवितो माथा....

राज्यातील कानाकोपऱ्यात ऐन गणेशोत्सवाची सर्वत्र धामधूम सुरू असताना विनाअनुदानित शाळेतील शिक्षक मात्र कोल्हापूरम ध्ये सुरू असलेल्या आंदोलनाच्या ठिकाणी गणेशोत्सव साजरा करण्याची वेळ आली आहे. आगामी कॅबिनेट बैठकीच्या पार्श्वभूमीवर आज शिक्षण उपसंचालक कार्यालय कोल्हापूर येथे, सरकारने येणाऱ्या मंत्रिमंडळ बैठकीत विषय घेऊन लवकरात लवकर टप्पा वाढीचा शासन आदेश काढावा, यासाठी विनाअनुदानित कृती समितीच्या शिक्षकांकडून सामुहिक गणपती जागरण आंदोलन केले. जेणेकरुन हे जागरण आणि त्याची एकत्रीत ताकत सरकारच्या डोक्यात सद्बुद्धी

देईल आणि आदेश निघेल. या उद्देशाने कृती समितीने जागरण करून आपल्या आत्म्यापासून सरकारला मनोभावे प्रार्थना केली. शिक्षणमंत्री धावा, मुख्यमंत्री धावा, तुमच्या नावानं चांगभलं, गोंधळ मांडला तुम्ही गोंधळाला यावं अशा विविध भजन गीतांनी आंदोलन ठिकाण ध्यानमय झाले होते.

या बाबत अधिक माहिती अशी की, राज्यातील अंशतः अनुदानित आणि विनाअनुदानित शाळांना अनुदानाचा वाढीव टप्पा मिळावा. संचमान्यतेचा जाचक शासन आदेश रद्द करावा, यांसह विविध मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने आंदोलन सुरू आहे. आज ४२ व्या दिवशीही आंदोलन सुरूच होते. आज ऐन गौरी पुजनाच्या दिवशी शिक्षण उपसंचालक कार्यालयाच्या परिसरात शिक्षकांनी धरणे आंदोलन केले. ११ दिवस आमरण उपोषण केले. तरीही शासनाला पाझर फुटलेला नाही. या आठवड्यात जीआर काढतो, त्या आठवड्यात जीआर काढतो असे शिक्षणमंत्र्यांकडून फक्त आश्वासनच दिले जात आहे. अद्याप अनुदानाच्या वाढीव टप्प्याचा जीआर काढला नाही. परंतु शासन जोपर्यंत वाढीव टप्प्याचा जीआर काढण्याचा निर्णय घेत नाही, तोपर्यंत आंदोलन सुरू राहणार असल्याची माहिती कृती समितीचे राज्य उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे यांनी दिली. आजच्या या आंदोलनात शिवाजी कुरणे, शिवाजी खापणे, तानाजी आकुर्डे, बी. जी. पाटील, अमोल पाटील, वैद्यनाथ चाटे, मुरलीधर कवाडकर, अजय थुल शिवाजी घाटगे अंकुश माने केदारी मगदूम युवराज पाटील जनार्दन दिंडे, राजू भोरे, अरविंद पाटील मनोहर चव्हाण अमोल पाटील, रमेश फरताडे, हनुमान सुरणार, राधेश्याम वारे सर, विजयकुमार हिप्परकर सर, संजय सर्जे सर, रईस खान सर, संपत उदगेरी सुरेश, जत तालुका नेहा भुसारी प्रतिभा कुभोजकार अमृता कुभोजे, रेश्मा सनदी, आदी शिक्षक मोठया संख्येने उपस्थित होते.

**● आजही आमची शासनाला प्रार्थना आहे ,गणपतीचा सण सुरू आहे, कोणताही त्रास शासनाला आणि समाजाला करण्याचा हेतू आमचा नाही, पण वेळ निघून जात आहे. जर लवकर निर्णय झाला नाही तर पर्यायाने आम्हाला आमच्या अस्तित्वासाठी प्राण पणाला लावावा लागेल आणि ते शासनाला महागात पडेल – खंडेराव जगदाळे, उपाध्यक्ष महाराष्ट्र राज्य**

**● भजन झालं, दंडवत झाले, गोंधळ झाला, महापूजा झाली, अनेक आंदोलनातून आम्ही फक्त प्रार्थना करतोय. परवा झिम्मा फुगडी जागर झाला, काल महामंत्र जप झाला, आज गणपती जागरण आंदोलन केले. हात जोडून करत असलेल्या आंदोलनाची दखल तात्काळ शासनाने घ्यावी. –शिवाजी कुरणे, जिल्हाध्यक्ष कोल्हापूर**

## ॲड.सुभाष राऊत यांचा रिपाइं कार्यालयात सत्कार रिपाइंकडून चळवळीच्या कार्यकर्त्यांची दखल

**बीड । प्रतिनिधी**

अखिल भारतीय समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष ॲड.सुभाष राऊत यांची राज्य अन्न आयोगाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल बुधवार (दि.११) सप्टेंबर रोजी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या हस्ते रिपाइंच्या जिल्हा मध्यवर्ती कार्यालयात रिपाइं पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत नवनिर्वाचित राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष ॲड.सुभाष राऊत यांचा सत्कार करण्यात आला.

बीड जिल्ह्यातील चिंचोली माळी येथील रहिवाशी असलेले व पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांचे निष्ठावंत व अखिल भारतीय समता परिषदेच्या माध्यमातून विविध आंदोलनात सक्रिय सहभाग घेऊन यशस्वी करण्याचे काम करणारे ॲड. सुभाष राऊत यांच्या कार्याची दखल घेऊन पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी त्यांची राज्य अन्न आयोगाच्या अध्यक्षपदी निवड केली आहे. निवडीबद्दल रिपाइंच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी राजू जोगदंड, किसन तांगडे, अविनाश जोगदंड, रणजीत शिनगारे, सादेक पठाण, आदी उपस्थित होते.

## कृषी मंत्र्याच्या जिल्ह्यात दोन वर्ष झाले तरी कांदा अनुदान मिळालेले नाही म्हणून शेतकऱ्यांनी निवेदन केले जिल्हाधिकाऱ्यांना

**● अनुदान मिळवून देण्यासाठी सहकार्याला धावून आली हिंद संस्था**

**नेकनूर । प्रतिनिधी**

हिंद संस्थेचे सचिव संजय शिंदे, संदीपान मस्के, आंबील वडगावचे सरपंच किलमिसे यांनी शिवकुमार स्वामी, निवासी जिल्हाधिकारी यांची भेट घेवून निवेदन देवून चर्चा केली. यावेळी स्वामी यांनी सांगितले की, याविषयी डी डी आर कार्यालयाशी संपर्क करून अनुदान मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू.

सदरील निवेदनात नमूद केले आहे की, आंबील वडगाव, कुंभारी आणि बाळापूर ता. बीड येथील शेतकऱ्यांनी सन २०२२ २३ या वर्षात खरीप लेट कांदा उत्पादन घेतले होते. अत्यल्प भाव मिळाल्याने शेतकऱ्यांना नुकसान सोसावे लागले होते. त्याची भरपाई व्हावी म्हणून शासनाने दिनांक १८ ऑगस्ट २०२३ रोजी शासन निर्णय काढून प्रती क्विंटल ३५० रुपये अनुदान देण्याचे घोषित केले होते . तसेच त्यानुसार अनुदान वितरीत करण्यात आले पण सदरील गावातील अनेक शेतकरी पात्र यादीत असून सुध्दा आजपर्यंत अनुदाना मिळालेले नाही. या शेतकऱ्यांनी सोलापूर येथील कृषी उत्पन्न बाजार समिती येथे कांदा विक्री केलेला आहे. संबधीत शेतकऱ्यांनी बऱ्याचवेळा भेट देवून कृषि उत्पन्न बाजार समितीला विचारणा केलेली आहे पण त्याचा कसलाच फायदा झालेला नाही. म्हणून शेतकऱ्यांनी हिंद संस्थेच्या सहकार्याने निवासी जिल्हधिकारी यांना निवेदन दिलेले आहे. त्यामध्ये तीन गावातील ३७ शेतकऱ्यांच्या सह्या आहेत.

● मी सोलापूर मार्केट ला २०२२ मध्ये १८ टन कांदा घातला होता १रू भाव मिळाला होता त्यामुळे माझे मोठे नुकसान झाले होते. सरकारने आम्हाला ३५० रू क्विंटल मंजूर अनुदान अजून मला मिळालेले नाही. सोलापूर येथे चाकरा मारणे आम्हाला परवडत नाही.– कपिल खिंडकर, आंबील वडगाव

● आमच्या शेतमालाला भाव नाही आणि त्यात सरकारी अनुदान दोन दोन वर्ष मिळत नाही त्यामुळे आम्ही शेती करावी की नाही असा प्रश्न आमच्या समोर आहे.– बंडू खराडे, आंबील वडगाव

● सोलापूर येथे मी कांदा घातला आणि मला नफ्या ऐवजी तोटा झाला. सरकार अनुदान देणार म्हणून सगळे कागदपत्र सोलापूर मार्केट कमितीला दिले माझे नाव पात्र यादीत असूनही मला अनुदान मिळालेले नाही. मी सोलापूर येथे जाऊन आलो पण मला येईल म्हणून सांगतात कधी येईल याची खात्री देत नाहीत.– धनराज तांदळे, आंबील वडगाव

## राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी जाणून घेतल्या विविध घटकांच्या अपेक्षा व संकल्पना

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी आज आपल्या छत्रपती संभाजीनगर दौऱ्यात विविध राजकीय पक्षांच्या प्रमुख नेत्यांशी जिल्ह्यातील व मराठवाड्यातील विविध विकास विषयक प्रश्नांवर चर्चा केली. तसेच विविध घटकांकडून विकास विषयक अपेक्षा व संकल्पना जाणून घेतल्या.

राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी आज छत्रपती संभाजीनगर दौऱ्यात सुभेदारी अतिथी गृह

येथे विविध राजकीय पक्षाचे नेते, लोकप्रतिनिधी, समाजातील विविध घटक आदींशी चर्चा केली. राज्यपाल यांच्याशी चर्चा करण्यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री अब्दुल सत्तार, विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, खासदार कल्याण काळे, खासदार संदिपान भुमरे, आमदार प्रशांत बंब, आ. रमेश बोरनारे, माजी खासदार इम्तियाज जलीलआदी मान्यवर उपस्थित होते. तसेच विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी हे सुद्धा उपस्थित होते.

राज्यपाल राधाकृष्णन यांच्या समोर मांडण्यात आलेल्या विषयांत प्रामुख्याने पाण्याचे समन्यायी वाटप, समतोल विकास, वैधानिक विकास महामंडळाचे पुनरुज्जीवन यासारखे प्रमुख विषय मांडण्यात आले. तसेच उद्योग विकासासाठी पायाभुत सुविधा विकास, पर्यटन विकासासाठी सुविधांचा विकास यासारखे विषय मांडण्यात आले. मराठवाड्यातील परभणी, हिंगोली आणि बीड यांच्या विकासासाठी विशेषत्वाने उपाययोजना करण्याबाबतही विषय मांडण्यात आले. राज्यपाल राधाकृष्णन यांनी सर्व गटांचे म्हणणे ऐकून घेत सर्व मागण्या व विकास संकल्पनांबाबत लक्ष घालण्याबाबत आश्वस्त केले.

*पुजा ताई मोरे पंचायत समिती सदस्य यांच्या हसते श्रींची आरती गेवराई येथे मोरया तरुन गणेश मित्र मंडळ पोखरी येथे करण्यात आली या प्रसंगी सत्कार करण्यात आला.*

## बीड येथे मनोज दादा जारंगे पाटील यांच्या घोंगडी बैठकीसाठी येणाऱ्या मराठा समाज बांधवांसाठी आरोग्यदुत बाजीराव दादा चव्हाण यांच्या तर्फे १० क्विंटल खिचडी वाटप

**बीड । प्रतिनिधी**

संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या घोंगडी बैठकीचे आयोजन आज बीड शहरात करण्यात आले होते. काल जारांगे पाटील यांची घोंगडी बैठक सकाळी परळी वैजनाथ व दुपारी केज या ठिकाणी संपन्न झाली . या घोंगडी बैठकीला हजारोच्या संख्येने मराठा बांधव उपस्थित होते. आणि आज मनोज दादा यांची घोंगडी बैठक बीड शहरातील छत्रपती धर्मवीर संभाजी महाराज मैदानात लाखो मराठ्यांच्या उपस्थितीत पार पडली . मनोज दादा जरांगे हे मराठा आरक्षणासाठीचा लढा अविरतपणे लढत आहे . मी मेलो तरी चालेल पण माझा विचार मरू देऊ नका , असा क्रांतिकारी सल्ला त्यांनी सकल मराठा समाजाला दिला आहे . हा लढा गरजवंत मराठ्यांच्या लेकराच्या भविष्यासाठी आहे , गरजवंत मराठ्यांना न्याय मिळेपर्यंत हा लढा असाच सुरू राहील असे देखील जरांगे पाटील म्हणाले . बीड शहरात आयोजित या घोंगडी बैठकीम ध्ये लखोच्या संख्येने मराठा बांधव उपस्थित होते. या घोंगडी बैठकीसाठी उपस्थित राहिलेल्या सर्व समाज बांधवांसाठी आरोग्य दूत बाजीराव दादा चव्हाण यांच्या तर्फे दहा क्विंटल खिचडीचे वाटप करण्यात आले आहे . घोंगडी बैठकीसाठी उपस्थित समाज बांधवांसाठी धर्मवीर प्रतिष्ठानच्या माध्यम ातून बाजीराव दादा चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली हा खिचडी वाटपाचा कार्यक्रम या ठिकाणी घेण्यात आला . आरोग्य सेवेबरोबरच बाजीराव दादा चव्हाण हे नेहमीच समाज उपयोगी उपक्रम राबवित असतात . या घोंगडी बैठकीत उपस्थित असलेल्या सर्व समाज बांधवांनी या खिचडी चा आस्वाद घेतला .

# 'बहरला पारिजात माझ्या दारी, फुले का पडती शेजारी ?'

## स्वत:ची ताकत ;पक्षासाठी कष्ट तरी मोहन जगतापांना उमेदवारीचा 'नो चान्सच!'

**▸ 'छत्रपती'च्या साक्षीनं'बाजीगर' होण्यासाठी वाजवा'तुतारी..'**

**माजलगाव । प्रतिनिधी**

एखाद्या फळवृक्षाची लागवड करायची.त्याला जोपासण्यासाठी अनेक वर्ष खतपाणी घालायचे, कष्ट घ्यायचे,मेहनत करायची. पोटच्या मुलाप्रमाणे त्याचे संगोपन करायचे.परंतु फळ खाण्याची वेळ आली कि,ऐनवेळी फळांनी डवरलेल्या त्या वृक्षाची मालकी तिसऱ्याकडेच गेल्याची परिस्थिती जेव्हा समोर येते. त्यावेळेस ज्या यातना,जो अपक्षाभंग,स्वप्नभंग त्या पोषण कर्त्यास अथवा त्याच्या परिवारास होतो.

त्याची मोजदाद करणं अशक्य आहे.अशा प्रसंगांवर आधारित पुराण कथेत भगवान श्रीकृष्णाच्या पत्नी सत्यभामा आणि रुक्मिणी यांच्या सवती मत्सराची एक कथा आपल्या वाचनात आहे.या कथेत श्रीकृष्णा कडून मागणी स्वरूपात मिळालेल्या पारिजाताच्या सुगंधित रोपाची लागवड सत्यभामा आपल्या दारात करते.त्याची निगा ठेवते. त्याला जोपासण्यासाठी कष्ट घेते.कालांतराने त्या रोपाचे रूपांतर सुगंधित कळ्यांच्या वृक्षात होते. झाड सुगंधित कळ्यांनी डवरल्या जाते.उद्या पहाटे या कळ्याचे रूपांतर फुलात झाल्यास आपण त्या फुलांची माळ तयार करून ती श्रीकृष्णाच्या गळ्यात घालु,अशा स्वप्नात सत्यभामा दंग असते.परंतु रात्रीतून लहरी वारा करामत करतो. आणि पारीजाताच्या अख्या फुलांचा सडा तो शेजारी असणाऱ्या सवत रुक्मिणीच्या दारात शिंपडतो. यामुळे सत्तेभामेचे स्वप्न भंगते.तिच्या मेहनतीने उभारलेल्या अपेक्षांचा चकनाचुर होतो.व स्वप्नात नसतानाही रुक्मिणीला पारिजाताची आयती सुगंधित फुलं मिळतात.यावर गदि माडगूळकरांनी एक सुंदर आजारामर गीत रचले आहे.'बहरला पारिजात दारी,फ ुले का पडती शेजारी ?का हे नाटक यांचे मज वेडीला फसवायाचे ?कपट का करती चक्रधारी ?इमानेइतबारे कष्ट घेणाऱ्याच्या नशिबी यातना,फसवीगिरी,कपट नीती का?असा सवाल या ओळीतून सत्यभामेने श्रीकृष्णास विचारला आहे.अगदी अशीच अवस्था म ाजलगाव मतदार संघात मोहन जगताप यांच्या वाट्याला नेहमी येत आली आहे.पक्ष शिवसेना असो,राष्ट्रवादी असो,की आजचा भाजप असो,विधान सभेच्या उम ेदवारीसाठीचा संघर्ष त्यांच्यासाठी अगदी ठरलेलाच दिसत आला आहे.पक्षासाठी कष्ट घेताना ते दिसतात. गाव खेड्यापर्यंत पक्षाची विचारधारा पोहोचवण्याचे काम त्यांनी केल्याचे सर्वांनी पाहिले आहे.यासाठी स्वतःची यंत्रणा राबवायची.खर्च करायचा.परंतु नेमकी विधानसभा जवळ आली की पक्षाच्या नेतृत्वाने इतर कोणाला तरी डोक्यावर बसऊन त्याचेच काम करण्याचे फर्मान सोडायचे.२००९ पासून त्यांच्या नशिबी हाच कित्ता सुरू आहे.तो कित्ता सर्वांसमोरच घडत आहे. तो सर्वश्रुत आहे.१९९९ ते २०१४ पर्यंत जगताप पिता पुत्रांनी राष्ट्रवादी काँग्रेसची ताकत येथे वाढवली.पक्षाची मशागत केली. परंतु ऐन वेळेस आ.प्रकाश सोळंके यांनी भाजप सोडून २००९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस जवळ केली.आणि राष्ट्रवादी काँग्रेसची उमेदवारी मिळवली.दरम्यान जगताप यांनी आ.सोळंके यांना पक्ष आदेशाने निवडून आणण्याचे काम केले. पुढच्या काळात सोळंके,जगताप 'एक म्यान में दो तलवार नही रहै सकते'या सूत्रानुसार जगताप यांनी राष्ट्रवादी काँग्रेस सोडून भाजपात प्रवेश केला.येथेही त्यांनी रसातळाला गेलेल्या भाजपला उभारी दिली.पक्ष वाढवला,गावा गावात कार्यकर्ते जोडले.परंतु २०१४ मध्ये भाजपाने त्यांची उमेदवारी याठिकाणीही डावलली आणि आरटी देशमुख यांना उमेदवारी दिली.देशमुख यांना आमदार करण्यात त्यांनी या निवडणुकीत सिंहाचा वाटा उचलून आपली पक्षनिष्ठा व आपली ताकद याठिकाणी सिद्ध केली.किमान नंतर २०१९ मध्ये तरी भाजप संधी देईल अशी अपेक्षा त्यांची या ठिकाणी होती. परंतु या वेळीही त्यांची पक्षाने निराशा करत पुढच्या वेळीचा शब्द देत,आडसकर यांना उमेदवारी दिली.व त्यांना निवडून आणण्याचे काम त्यांच्यावर सोपवले. आडसकरांचा पराभव निसटता झाला.परंतु नवक्या उमेदवाराला इथपर्यंत नेण्याचं बळ जगतापांच होतं,हे कोणीच नाकारू शकणार नाही.२०१९ ची विधानसभा निवडणूक आडसकर विरुद्ध सोळंके वगळता इतर मागच्या निवडणुकीत ज्यांच्या बाजूने मोहन जगताप यांचं काम राहिलं,तोच उमेदवार निवडून आला आहे.या वास्तवाला काही अपवादात्मक विरोधक असले तरी ही वस्तुस्थिती मात्र खरी आहे. १९९९ नंतर कुठलंही सत्तेचं पद स्वतःकडं नसताना आपली राजकीय ताकत ते कायम टिकऊन आहेत.२०२४ मध्ये तरी पक्षाकडून त्यांना उमेदवारी मिळेल अशी त्यांची व त्यांच्या संपूर्ण मित्र मंडळाची अपेक्षा होती.यावेळी पक्ष नेतृत्वाने त्यांना विधानसभा प्रमुख पद देऊन त्यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब केल्याची चर्चा होती. परंतु राज्यात महायुतीचा प्रयोग झाला.आणि युती धर्मानुसार पुन्हा ही जागा राष्ट्रवादी काँग्रेस म्हणजेच सोळंके यांच्याकडे जाणार असल्याची परिस्थिती आहे.त्याम ुळे येथेही उमेदवारीचा'नो चान्सच' त्यांना दिसून येत आहे.'बहरला पारिजात माझ्या दारी,फुले का पडती शेजारी'इमानेइतबारे कष्ट घेणाऱ्याच्या नशिबी यातना, फसवीगिरी,कपट नीती का?असा सवाल सत्यभामेने श्रीकृष्णास जसा विचारला होता.तसाच सवाल मोहन जगताप यांच्या बाबतीत पक्षश्रेष्ठीकडे कार्यकर्त्यांकडून उपस्थित केला जात आहे.दरम्यान मोहन जगताप यांच्या विधानसभेसाठीच्या उमेदवारीची हुलकावणी सुरूच आहे.असे असले तरी मतदार संघातले त्यांचे काम मात्र कधीच थांबत नाही. पक्षाला,मित्रमंडळाला खतपाणी देण्याचे काम त्यांचे सुरूच आहे. आणि मेवा मात्र इतरांच्या नशीबी आल्याचे चित्र आहे.वास्तविक पाहता आ.प्रकाश सोळंके यांना मतदार संघात तुल्यबळ मोहन जगताप यांच्या शिवाय दुसरा नेता नाही.भलीम ोठी राजकीय ताकत असणारे हे दोनच कारखानदार नेते मतदारसंघात पावरफुल आहेत. आपल्या वैयक्तिक ताकतीच्या जोरावर अपक्ष निवडून येण्याचा करिष्मा ते दाखवू शकतात.बाकी 'भावींच्या'बाबतीत हे सांगता येणे शक्य नाही.माजलगाव धारूर वडवणी तिन्ही तालुक्यात स्वतःची ताकत,कार्यकर्त्यांची फौज,छत्रपती कारखान्याच्या साक्षीनं शेतकऱ्यांचं साधलेलं हित.बूथवाईज निवडणूक यंत्रणा,असा सर्व प्रभावी जमपट त्यांच्या स्वतः जवळ आहे.२०१४ आणि १९ मध्ये जगताप यांच्या साठी आमदारकीची मोठी संधी होती.

पक्ष नेतृत्वाच्या हुलकावणी मुळे ती हुकली. आज २०२४ मध्येही जगतापांचे वातावरण तेच आहे. गरज आहे या निवडणुकीत त्यांनी नशीब आजम ावण्याचे. मागील इतिहास आहे,त्यांचे राजकीय गुरू वडील बाजीराव भाऊ यांनी निर्भीडपणे १९९५ साली राज्याच्या एका मोठ्या नेत्याच्या विरोधाला डावलून अपक्ष निवडणूक लढवून विधान सभेत बाजी मारली होती.'आमदारकी' मिळवून ते सामान्य मतदार, नागरिकांचे'बाजीगर'झाले होते. मोहन जगताप यांनीही निवडणूक लढवऊन आपली निवडणूक लढण्याची विश्वासार्था टिकवणे गरजेचे आहे.मोहन जगताप निवडणूक लढवत नाहीत.हा मेसेज विरोधकांकडून मतदारात पसरविण्यात आला आहे.हा जगताप यांच्यासाठी मायनस पॉईंट आहे.कारण लोक अजूनही 'तुळजा भवानीची शपथ'विसरलेले नाहीत. त्यामुळे निवडणूक लढवण्याची विश्वसार्था आज त्यांच्यासाठी गरजेची आहे.यंदा बदलत्या पोषक वातावरणा नुसार कार्यकर्त्यांचा त्यांना रेटा आहे.'लढेंगे जितेंगे च्या भूमिकेत आहे.खट्याळ वारारूपी पक्षातील चुगलखोर त्यांच्या विरोधात असेल.प्रस्थापित राजकारन्यांची कपट नीती त्यांना आडवी असेल.परंतु निस्वार्थ काम करणारा कार्यकर्ता'छत्रपतीच्या' साक्षीने म्हणत आहे.'बाजीगर' व्हा.डर के आगे जीतही है.विजयी उत्सवाची आता वाजवा'तुतारी'

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज

बीड । परभणी । छत्रपती संभाजीनगर । जालना । लातूर । धाराशिव । हिंगोली । नांदेड । नगर

# मराठवाडा पत्र

● जिल्हा विशेष ● गुरूवार, दि. १२ सप्टेंबर २०२४ ● पान ४

# बोंबला.. माजलगाव तहसील कार्यालयात पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहच नाही

## अपंग, वयोवृद्ध, गर्भवती महिला यांची हेळसांड थांबवावी: भाई ॲड.नारायण गोले पाटील

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्याच्या सर्व कार्यालयाचे वरिष्ठ कार्यालय म्हणून तहसील कार्यालयाकडे पाहिले जाते, मात्र माजलगाव तहसील कार्यालयात हजारो नागरिक दररोज उंबरे झिजवत असताना तहसील कार्यालयात कुठलेच काम होत नाही याशिवाय वयोवृद्ध नागरिक अपंग आणि गर्भवती महिला हे देखील संजय गांधी निराधार इंदिरा गांधी निराधार योजनेच्या विविध कामासाठी तहसील कार्यालयाचे उंबरे झिजवत असताना तहसील कार्यालयात दिवस ठाण मांडून बसतात पण तहसीलदार यांना त्यांच्यासाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावीशी वाटली नाही याशिवाय

मुतारी संडास बाथरूम यांचा अभाव तहसील कार्यालयात असल्याने शेतकरी कामगार पक्ष आक्रमक झाला असून तहसीलदार यांनी १७ सप्टेंबर पूर्वी तहसील कार्यालयात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी महिलांसाठी अपंगासाठी, वयोवृद्धांसाठी ,पुरुषांसाठी स्वच्छतागृहाची व्यवस्था करण्यात यावी याशिवाय तहसील कार्यालयात चाललेली अधिकारी कर्मचारी यांची मनमानी थांबवावी तहसील कार्यालयातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी मुख्यालय वास्तव्यास थांबावे, तसेच तहसील कार्यालयात चाललेला भ्रष्टाचार थांबवून सामान्य नागरिकाची कोळंबून पडलेली कामे त्वरित करण्यात यावीत आदी मागण्याचे दहा सप्टेंबर रोजी

(उर्वरित पान २ वर)

## ईट नाथापूर रोडवर वाळू टाकल्याने तीन मोटारसायकलचा अपघात

**ईट । प्रतिनिधी**

पिंपळनेर पोलिस स्टेशनच्या हद्दीमध्ये येत असलेल्या बीड नाथापुर रोडवर ईट येथीलच सूतगिरणी जवळ रोडला दर दिवस ४ ते ५ टीप्पर चोरट्या मार्गाने शिल्पणा नदी येथील वाहळू आणून रोडवर टाकली जाते विकली जात असल्याने वाहतूक दारणा अंधार मध्ये नाहक त्रास सहन करावा लागत आहे. मंगळवार दिनांक १० सप्टेंबर रोजी रस्त्याला वाहळू अंधारामधे न दिसल्याने तीन मोटार सायकलच्या अपघातात चार ते पाच जण जखमी झाल्याने त्यांना बीड येथील एका खाजगी रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले. वाहलू टाकणाऱ्या अज्ञातावर पिंपळनेर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात ची प्रक्रिया सुरू असल्याचे सूत्रांनी आमच्या प्रतिधीला कळवले आहे. या कडे एसपी बारगळ सहेबानी लक्ष देण्याची गरज आहे .असे जन सामन्यांमध्ये बोलले जात आहे. नसता या वाळू चोरांना जबर बसणार नाही.

## केज विधानसभेसाठी नेकनुर च्या सरपंच अनिता सुंदर लांडगे यांनी उमेदवारीसाठी घेतली मनोज जरांगे पाटलांची भेट

### सौ. अनिता लांडगे च्या रूपाने केज मतदार संघाला आमदाराच्या रूपाने मिळणार वाघीण ?

**नेकनूर । प्रतिनिधी**

मराठ्यांना आरक्षण मिळावे यासाठी गेल्या वर्षभरापासून मराठा योद्धा जरंगे पाटील यांनी आंदोलनाचे हत्यार उपसल्याने येणाऱ्या काही दिवसात मराठ्यांना आरक्षण नाही दिले तर महाराष्ट्रामध्ये विधानसभेसाठी उमेदवार उभे करणार अशी घोषणा केल्याने केज विधानसभेसाठी नेकनुर चे सरपंच अनिता सुंदर लांडगे यांनी ग्रामपंचायत

सदस्य यांच्या सह शिष्टमंडळासहित मनोज जरांगे पाटलांची भेट घेऊन केज विधानसभेसाठी मी इच्छुक असल्याचे सांगितले. त्यांच्यासोबत नेकनुर मधील १४ ग्रामपंचायत सदस्य व इतर शेकडो कार्यकर्ते होते.

गेल्या वर्षभरापासून मराठा योद्धा सन्माननीय मनोज जरांगे पाटील यांनी मराठ्यांना आरक्षण मिळण्यासाठी अखंडपणे

(उर्वरित पान २ वर)

## जिल्हा वकील संघाला आ.क्षीरसागरांनी दिली भेट

### नवनिर्वाचित कमिटीला दिल्या शुभेच्छा

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा वकील संघाला आ.संदीप क्षीरसागर यांनी मंगळवारी (दि.१०) रोजी भेट दिली. यावेळी बीड जिल्हा वकील संघाच्या नवनिर्वाचित कमिटीला आ.क्षीरसागर यांनी शुभेच्छा दिल्या. बीड जिल्हा वकील संघाची नुकतीच पार पडली आहे. यामध्ये जेष्ठ विधीज्ञ ॲड. रोहीदास येवले यांची अध्यक्ष

म्हणून, व ॲड.यासीर पटेल यांची सचिव म्हणून निवड झाली आहे. दरम्यान आ.संदीप क्षीरसागर यांनी

(उर्वरित पान २ वर)

## ३४ व्या किशोर किशोरी राष्ट्रीय खो खो अजिंक्यपद स्पर्धेकरिता जिल्हास्तरीय निवड चाचणी

**बीड । प्रतिनिधी**

३४ व्या किशोर किशोरी राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा दि.२८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर यादरम्यान झारखंड येथे होणार आहे. व वडोदरा गुजरात येथे पश्चिम विभागीय खेलो इंडिया महिला लेग होणार आहे. या दोन्हीही स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे किशोर व किशोरी संघ सहभागी होणार आहेत याकरिता महाराष्ट्र खो-खो असोसिएन दि.१५ सप्टेंबर २०२४ रोजी धाराशिव येथे निवड चाचणी आयोजित केली आहे. तरी बीड जिल्ह्यातील दोन मुले व दोन मुली खेळाडूंना निवड चाचणीसाठी पाठवायचे आहे. सदरील खेळाडू पुढील स्पर्धेसाठी सहभागी होणार आहेत. करिता जिल्ह्यातील खेळाडूंनी दि.१३ सप्टेंबर २०२४ ला जिल्हा निवड चाचणीसाठी शारदा स्पोर्ट्स अकॅडमी गेवराई येथे सकाळी ९: ०० वाजता उपस्थित राहावे. निवड झालेले दोन किशोर आणि किशोरी खेळाडूंना राज्यस्तरीय निवड चाचणीसाठी पाठवण्यात येईल निवड समिती सदस्य म्हणून श्री विनोद शिंदे (बीड) श्री.नितीन पुटवाड (माजलगाव) श्री.भरत यादव (गेवराई) सदस्य आहेत. तरी बीड जिल्ह्यातील खेळाडूंनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान एमॅच्युअर खो-खो असोसिएशन बीड च्या वतीने अध्यक्ष श्री. ऋषिकेश शेळके व सचिव श्री. विजय जाहेर यांनी केले आहे.

## अंबादास दादा दानवे यांच्या उपस्थितीत बीड जिल्हा शिवसेनेची बैठक

### शिवसेना जिल्हा प्रमुख परमेश्वर सातपुते

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे विरोधी पक्ष नेते तथा शिवसेनेचे मराठवाडा संपर्क नेते माननीय अंबादास जी दानवे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड येथे उद्या सकाळी १० वाजता हॉटेल ग्रँण्ड यशोदा या ठिकाणी शिवसेनेचे प्रमुख पदाधिकारी व शिवसेनेचे कार्यकर्ते शिवसैनिक यांची महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आलेली आहे.

या बैठकी बाबतीत माननीय विरोधी पक्ष नेते अंबादास दादा दानवे, संपर्क नेते सुनीलजी प्रभु साहेब, मराठवाडा सम न्वयक उपनेते विश्वनाथ नेरुळकर साहेब,

(उर्वरित पान २ वर)

### ॲड. नरसिंह जाधव यांचा गावभेट दौरा. ...

## आजी- माजी कुणीच नको; सुशिक्षित, स्वच्छ प्रतिमा असलेला उमेदवार हवा जनतेतून होतेय मागणी

**आष्टी । प्रतिनिधी**

आगामी विधानसभेसाठी आष्टी पाटोदा शिरूर मतदारसंघातून निवडणूक लढवण्यासाठी सर्वच पक्षाकडून इच्छुक उमेदवारांची तयारी सुरू असून, मतदारसंघातील गावागावात इच्छुक उमेदवार जाऊन, निवडणुकीला उभे राहणार

असून आपल्याला मदत करावी अशी मागणी करीत आहेत. यामध्ये पाटोदा तालुक्यातून पहिल्यांदाच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाकडून ड. नरसिंह जाधव हे निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असून त्यांनी पक्षाकडे आपल्याला उमेदवारीची संधी मिळावी अशी मागणी केली आहे. त्यासाठी त्यांनी

(उर्वरित पान २ वर)

*अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय समोर केलेल्या बेमुदत धरणे आंदोलनात खासदार बजरंग बप्पा सोनवणे, आमदार संदीप भैय्या क्षिरसागर,माजी आ.सय्यद सलीम शिवसेना बीड जिल्हा प्रमूख परमेश्वर सातपुते, स्वप्नील भैय्या गलधर, उ, बी.बी जाधव सर,युवासेनेचे उपजिल्हाप्रमुख अभिषेक भैय्या दिवे,विनोद गुंड पाटील, दीपक घोडके पाटील, अजय गायकवाड, राजेंद्र सातपुते सह.*

### माजलगांवात मध्ये लहुजी विरोद्री सेनेचा वतीने जगविख्यात साहित्यिक...

## महामानव डॉ.आण्णाभाऊ साठे यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार द्या या मागण्यासाठी दोन तास रास्तारोको आंदोलन

**माजलगांव । प्रतिनिधी**

माजलगांवात मध्ये लहुजी विरोद्री सेनेचा वतीने जगविख्यात साहित्यिक , साहित्यरत्न महामानव डॉ.आण्णाभाऊ साठे यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार द्या या मागण्यासाठी दोन तास रास्तारोको आंदोलन करण्यात आले.

माजलगांव शहरातील वसंतराव नाईक (परभणी फाटा )येथे दोन तास रास्तारोको आंदोलन करण्यात आले होते.

खालील प्रमाणे प्रमुख मागण्या- १) जगत विख्यात साहित्य सम्राट लोकशाहिर महामानव डॉ.

(उर्वरित पान २ वर)

## राधाराणी म्हणजे श्रीकृष्णांची शक्ती- परमपूज्य राधेश्यामानंदजी महाराज!

**बीड । प्रतिनिधी**

सावता माळी चौकातील श्री श्री राधागोविंद मंदिर मंदिरात श्री राधाष्टमी महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. श्री राधाराणीचे महत्व सांगताना ,भगवान श्रीकृष्णांच्या उजव्या बाहूपासून श्री बलराम व डाव्या बाहूपासून श्रीमती राधा राणींचा विस्तार झाला. राधाराणी म्हणजे श्रीकृष्णांची शक्ती आहे तसेच भगवान श्रीकृष्णांना आनंद देण्यासाठी आणी भगवान श्रीकृष्णांच्या लीलांचे संवर्धन करण्यासाठी अवतार घेते, असे परमपूज्य राधेश्याम आनंदजी महाराज यांनी सांगितले. सकाळी आठ वाजता शृंगार दर्शन, दहा वाजता श्री श्री राधागोविंद पंचामृत अभिषेक, श्री राधाकथा, दुपारी साडेबारा वाजता महाआरती आणि भाविक भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. अशी माहिती श्रीमान कृष्णनाम दास यांनी दिली.

# भारतीय जवान किसान पार्टीचा मराठवाडा ओला दुष्काळ पाहणी दौरा संपन्न

## शेतकऱ्यांना तातडीने सरसकट नुकसान भरपाई द्या अन्यथा जिल्हा अधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडणार : प्रदेशाध्यक्ष अंकुश खोटे

**आष्टी । प्रतिनिधी**

मराठवाड्यामध्ये गेल्या काही दिवसात पावसाने थैमान घातल्याने काढणीस आलेली खरिपाची पिके वाया गेल्याने बळीराजाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. बळीराजाला आर्थिक मदत देऊन धीर देण्या ऐवजी सरकार मधील काही मंत्री शेतकऱ्यांची लायकी काढत आहे.भारतीय जवान किसान

पार्टीने मराठवाडा ओला दुष्काळ पाहणी दौरा काढत शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी करून धीर दिला आहे.यामध्ये शेतकरी आणि सैनिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.बाधित शेतकऱ्यांना तातडीने सरसकट नुसकान भरपाई देण्यात यावी अन्यथा जिल्हा अधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा भारतीय जवान किसान पार्टीचे महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष माजी सैनिक अंकुश दादा खोटे यांनी दि.११ सप्टेंबर रोजी माध्यमांशी बोलताना दिला.

गेल्या काही दिवसापासून मराठवाड्याला अतिवृष्टी पावसाने झोडपल्याने शेतकऱ्यांची पिके पाण्याखाली गेली आहेत त्यामुळे काढणीस आलेली पिके हातची गेल्याने शेतकरी उध्वस्त झाला आहे.दुष्काळाच्या झळा शोषणारा बळीराजा अतिवृष्टीने झोडपून निघाला आहे. आसमानी संकट कोसळल्याने हातबल झाला आहे. सरकार झोपेचं सोंग घेत असल्याचे दिसून येताच स्वराज्य पक्षाचे अध्यक्ष छत्रपती संभाजी राजे भोसले,प्रहार पक्षाचे अध्यक्ष आमदार बच्चू कडू,

(उर्वरित पान २ वर)


Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com